आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१ मार्च २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- अमेरिका आणि इस्त्राएलच्या हल्ल्यात अयातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर आता अयातुल्लाह अलिरेझा अराफी इराणचे हंगामी नेते

- देशातल्या शीख बांधवांच्या सन्मान आणि न्यायासाठी सरकार कटिबद्ध असल्याची प्रधानमंत्र्यांची नवी मुंबईतल्या हिंद दि चादर कार्यक्रमात ग्वाही

- तामिळनाडूत मदुराई इथं चार हजार चारशे कोटी रुपये खर्चाच्या विकासप्रकल्पांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ

- नागपूर जिल्ह्यात कारखान्यातल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू, १८ जखमी, मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश, मृतांच्या कुटुंबाना ५ लाख रुपयांची मदत

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आजच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्त्राएलच्या हल्ल्यात इराणचे नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर इराणचे हंगामी नेते म्हणून धर्मगुरू अयातुल्लाह अलिरेझा अराफी यांची नियुक्ती झाली आहे. इराणच्या संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढचा उत्तराधिकारी निवडला जाईपर्यंत ते या पदाचं काम पाहतील, असं इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलनं काल केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख आणि संरक्षण मंत्री देखील मृत्युमुखी पडल्याचं वृत्त आहे. या हल्ल्यात इराणचे ४० पेक्षा जास्त सरकारी अधिकारी मारले गेले, किमान २०१ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ७०० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले.

हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी इराणनं संपूर्ण मध्यपूर्वेत हल्ले सुरु केले आहेत. दुबई, दोहा, बहरीन आणि कुवेतमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ असलेल्या किंवा अमेरिकेशी संबंधित ठिकाणी इराणने हल्ले केल्याचं वृत्त आहे.

इराणनं अयातुल्ला खमेनी यांच्या हत्येचा बदला घेण्याची प्रतिज्ञा केल्याच्या पार्श्वभूमीवर, इराणवरचे हल्ले आणखी तीव्र केले जातील, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतेनियो गुटेरस यांनी या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला असून दोन्ही पक्षांनी ताबडतोब शस्त्र खाली ठेवून वाटाघाटी सुरु कराव्या असं आवाहन सुरक्षा परिषदेच्या तातडीनं बोलावलेल्या बैठकीत केलं. हा हल्ला मानवतेविरुद्धचा गुन्हा असून इराणमधे नरसंहार झाला आहे, असं इराणच्या प्रतिनिधींनी सांगितलं. इराणमध्ये ४० दिवसांचा दुखवटा जाहीर झाला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या प्रतिनिधींनी मात्र या कारवाईचं समर्थन केलं. जगभरात या संघर्षाचे पडसाद उमटत आहेत. चीननं या घडामोडींबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली असून तात्काळ युद्ध थांबवण्याचं आवाहन केलं आहे. अमेरिकेच्या माजी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी या हल्ल्यांवर तीव्र टीका केली आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी खामेनी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हत्येचा तीव्र निषेध केला आहे. ही गोष्ट नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचं उल्लंघन करणारी असून, निंदनीय असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तर, पश्चिम आशियातल्या इराणच्या हल्ल्यांचा युनायटेड किंगडमनं निषेध केला आहे. इराणच्या हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी आपली प्रादेशिक संरक्षण प्रणाली सज्ज झाल्याचं युकेनं म्हटलं आहे. भारतातही अनेक ठिकाणी या हल्ल्याचा निषेध केला जात आहे. कालचा हल्ला विनाकारण आणि संहारक ठरला असून केंद्र सरकारनं या परिसरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन काँग्रेस प्रवक्ता शमा मोहम्मद यांनी केलं आहे. काश्मीरच्या विविध भागात निदर्शनं होत असून मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला यांनी शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे.

या युद्धाच्या तणावामुळे दुबई विमानतळावरची उड्डाणं अनिश्चित काळासाठी स्थगित केली आहेत. या विमानतळाबाहेर काही तासांपूर्वी स्फोट झाला होता. या वेळी दुबई विमानतळावर अडकलेली भारताची बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू हिला सुरक्षित स्थानी हलवलं आहे. पुण्यातल्या Indira School of Business Studies चे ८४ विद्यार्थी या विमानतळावर अडकून पडले, मात्र ते सुरक्षित असल्याचं या संस्थेचं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियात पेटलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं तिथल्या भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय दूतावास रात्रंदिवस मदतीसाठी उपलब्ध असतील असं त्यात म्हटलं आहे.

तसंच भारतात तात्पुरत्या वास्तव्यासाठी आलेल्या परदेशी नागरिकांसाठीही परराष्ट्र मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ज्या नागरिकांना व्हिसाची मुदत वाढवून हवी आहे, अथवा आपलं वास्तव्य नियमित करून हवं आहे, त्यांनी आपल्या जवळच्या परदेशी नागरिक नोंदणी कार्यालयाशी संपर्क साधावा, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाला सामाजिक एकतेची सर्वाधिक गरज असताना हिंद दि चादर या सारख्या कार्यक्रमातून गुरू आणि संताचा आशीर्वाद आपल्यासोबत असल्याचा विश्वास मिळतो असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी मुंबईत आयोजित हिंद दि चादर कार्यक्रमात व्हिडिओ संदेशाच्या माध्यमातून त्यांनी संबोधित केलं. देशातल्या सर्व समाजातल्या नागरिकांनी शीख समाजातल्या गुरूंपासून प्रेरणा घेतली असं ते म्हणाले. देशातल्या शीख बांधवांच्या सन्मान आणि न्यायासाठी सरकार कटिबद्ध आहे असं सांगून शीख समुदायासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली.

शीख धर्मातल्या सर्व १० गुरूंनी धर्म रक्षणाचंच काम केलं. जागतिक पातळीवर या गोष्टी अनुकरणीय असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यावेळी म्हणाले. संत सेवालाल महाराज, पोहरा देवी आणि संत नामदेव यांना यावेळी शहा यांनी नमन केलं.

- **- होल्ड.. बाईट- अमित शहा - -**

नवी मुंबईत गुरू तेग बहादुर यांच्या नावानं नवीन रुग्णालय सुरू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या सभेत दिलं. शालेय अभ्यासक्रमात तेग बहादुर यांच्या बलिदानावर आधारित धडा समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवारही यावेळी उपस्थित होते.
गुरू तेग बहादुर यांच्या साडेतीनशेव्या शहीद दिनानिमित्त आयोजित हिंद-दी-चादर या कार्यक्रमाला नवी मुंबईत खारघर इथे ओवे मैदानात सुरुवात झाली. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाला १५ लाखांहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

तामिळनाडूमधे मदुराई इथं चार हजार चारशे कोटी रुपये खर्चाच्या विकासप्रकल्पांचं भूमिपूजन आणि उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झालं. यात कुंभकोणम, येरकौद आणि वेल्लुर या तीन आकाशवाणी एफ एम रिले ट्रान्समीटरचा समावेश आहे. यामुळे राज्यातल्या अनेक जिल्ह्यांमधे प्रसारण सेवा पोहोचणार आहे. तामिळनाडूच्या विकासाच्या प्रवासात हा मैलाचा दगड आहे, असं प्रधानमंत्री यावेळी आयोजित सभेत म्हणाले. यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी तमिळनाडू**

पुदुच्चेरी इथं दोन हजार सातशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज झालं. राज्यातल्या आणि केंद्रातल्या डबल इंजिन सरकारने मिळून काम केल्यामुळे इथला विकास वेगाने झाला असून या प्रकल्पांमुळे पुदुच्चेरीच्या लोकांच्या जीवनात परिवर्तन घडेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्र्यांनी पुदुच्चेरीत पायाभूत सुविधा, नागरी सेवा, उद्योग, शिक्षण, आरोग्य संदर्भातल्या विविध १९ प्रकल्पांचंही उद्घाटन केलं. यात ई बस, कमांड अँड कंट्रोल सेंटर, आर्थिक दुर्बल घटकांसाठी घर आणि पाणीपुरवठा योजनेचा समावेश आहे.

**<><><><><>**

नागपूर जिल्ह्यात काटोलजवळ राऊळगाव इथं आज सकाळी एका कारखान्यात झालेल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू झाला, तर १८ जण जखमी झाले. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाल्याचं स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरु असून, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चं पथक मदतकार्य करत असल्याचं जिल्हाधिकारी बिपिन इटनकर यांनी सांगितलं.

या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसाला राज्यशासनातर्फे ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची

मदत जाहीर केली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर एट फेरीत आज कोलकता इथं भारताचा सामना वेस्ट इंडिजशी होत आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा वेस्ट इंडिजच्या १४ षटकात ३ बाद ११९ धावा झाल्या होत्या.

उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं आवश्यक आहे.

सुपर एटमधे आज दिल्लीत झालेल्या सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं झिंबाब्वेवर ५ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना झिंबाब्वेनं ७ गडी गमावून १५३ धावा केल्या. दक्षिण अफ्रिकेनं ही धावसंख्या ५ गड्यांच्या मोबदल्यात १८ व्या षटकातच पार केली.

**<><><><><>**

तेलंगणात हैदराबाद इथे येत्या ८ मार्चपासून सुरू होणाऱ्या एफ आय एच हॉकी विश्वचषक २०२६च्या पात्रता फेरीसाठी आज हॉकी इंडियाने भारतीय महिला संघाची घोषणा केली.

**//<><><><><>//**